डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे

(महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वायत्त संस्था)
मुख्यालय : २८ क्वीन्स गार्डन, कॅम्प, पुणे - ४११००१

barti

दूरध्वनी क्र. ०२०-२६३४३६००/२६३३३३३०/२६३३३३३९ Website - www.barti.in E-mail - dg@barti.in

जा.क्र.बार्टी/पुणे/योजना विभाग/IBPS(०७)/२०२३-२४/156 दि. 09/०२/२०२४

# Shortfall Documents Notification

Tender ID: 2023_SJASA_933759_1

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे यांच्याकडून अनुसूचित जातीतील युवक युवतींसाठी बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. व लिपीक वर्गीय तत्सम पदाच्या स्पर्धा पूर्व निवासी प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यासाठी महाराष्ट्र राज्यातील मुंबई जिल्ह्यामध्ये प्रशिक्षण संस्थांची निवड करण्याकरिता दि.०९/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनाच्या http://mahatenders.gov.in व http://barti.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर निविदा धारकांनी जोडलेल्या कागदपत्रांची तांत्रिक मूल्यामापन करताना असे आढळून आले की, निविदा धारकांनी तांत्रिक लिफाफ्यातील निकषांच्या आवश्यकतेनुसार कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर केली आहेत. म्हणून महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन निर्णय दि.१७/०९/२०१९ रोजी नुसार तांत्रिक समितीने खालील तपशिलानुसार कागदपत्रे ऑनलाईन सादर करण्यासाठी खालील निविदा धारकांना सूचित करण्याचा निर्णय घेतला आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव | कमी/अपूर्ण कागदपत्रे |
|---|---|---|
| १. | आपकृषी बहुउद्देशीय प्रशिक्षण व शैक्षणिक संस्था | १. संस्थेचा GST नोंदणी क्रमांक याबाबतचे पुरावे जोडावे.<br>२. संस्थेच्या नावे रूपये ५,००,०००/- एवढ्या रक्कमेचे राष्ट्रीयकृत बँकचे निविदा प्रसिद्ध झाल्यानंतरचे हैसियत प्रमाणपत्र (Bank Solvency Certificate) सादर करावे.<br>३. मागील पाच वर्षातील केवळ बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, नियुक्ती पत्र, प्रवेश अर्ज जोडावे.<br>४. संस्थेचे वेबपेज, वेबसाईट तसेच वाय फाय सुविधा असलेबाबत पुरावे जोडावे.<br>५. स्वतंत्र वातानुकुलीत अभ्यासिका असल्याबाबत छायाचित्रे जोडलेली नाहीत, तसेच किमान किती विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आहे याबाबत पुरावे जोडावे.<br>६. प्रशिक्षण संस्थेमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा तसेच आधार संलग्न बायोमेट्रीक सुविधा असलेबाबत पुरावे जोडावे.<br>७. संस्थेचे/फर्मचे नाव काळ्या यादीत नाही. तसेच संबंधित संस्थेच्या कोणत्याही नातेवाईकास काम देण्यात येणार नाही त्याबाबतचे हमी पत्र जोडावे.<br>८. सर्व सुविधांनी युक्त, हवेशीर दारे खिडक्या असलेली मुला-मुलींसाठी स्वतंत्र निवास व्यवस्था, स्वतंत्र गाद्या, कॉट, बेडशीट ब्लँकेट, कपाटाची सोय, स्वच्छता गृह, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची सुविधा, खोलीत स्टडी टेबलची व्यवस्था स्वच्छ स्वयंपाकगृह व स्वतंत्र भोजनगृहामध्ये भोजन व चहा-नाश्ताची व्यवस्था, |

| | | |
|---|---|---|
| | | सी.सी.टी.व्ही. तसेच अग्नीशामक यंत्रणा असल्याबाबत वसतिगृहाचे छायाचित्र व पुरावे जोडावे.<br>९. सन २०१७-२०२० चे वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र जोडावे.<br>१०. शासकीय यंत्रणा/ विभाग यांचे सोबतचे कार्यरंभ आदेश/सामंजस्य करार झाला असल्यास जोडावे.<br>११. मोबाईल ॲप, डिजिटल स्टुडिओ, विद्युत बॅकअपसह संगणक Lab मध्ये उपलब्ध असलेले संगणक संख्या, ऑनलाईन टेस्ट सिरीज, याबाबत पुरावे तसेच छायाचित्रे जोडावे.<br>१२. संस्थेचे अध्यक्ष/संस्थाचालक/व्यवस्थापक/सचिव इ. अनुसूचित जातीतील असल्यास जातीचा पुरावा जोडावे. |
| २. | मानसी महिला औद्योगिक सहकारी सोसायटी लिमिटेड | १. मागील पाच वर्षातील केवळ बँक, रेल्वे, एल. आय. सी. इ. मध्ये नोकरीच्या संधी प्राप्त झालेल्या विद्यार्थ्यांची यादी, नियुक्ती पत्र, प्रवेश अर्ज जोडावे.<br>२. संस्थेचे वेबपेज, वेबसाईट असलेबाबत पुरावे जोडावे.<br>३. स्वतंत्र वातानुकुलीत अभ्यासिका असल्याबाबत छायाचित्रे जोडलेली नाहीत, तसेच किमान किती विद्यार्थ्यांची बैठक व्यवस्था आहे याबाबत पुरावे जोडावे.<br>४. प्रशिक्षण संस्थेमध्ये सी.सी.टी.व्ही. यंत्रणा असलेबाबत पुरावे जोडावे.<br>५. मागील ३ वर्षातील (कोविड काळ वगळता सन २०२०-२१ व २०२१-२२) लेखापरिक्षण अहवाल तसेच वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र सादर करावे.<br>६. डिजिटल स्टुडिओ व ऑनलाईन टेस्ट सिरीज याबाबत पुरावे तसेच छायाचित्रे जोडावे. |

उपरोक्त नमूद ई-निविदा धारकांनी तक्त्यात नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे योग्य स्वरुपात व सुस्पष्ट दस्त ऑनलाईन पोर्टल https://mahatenders.gov.in वर दि.१९/०१/२०२४ रोजी दु.१२.०० पर्यंत सादर करावी. सदर मुदतीनंतर कमी/अपूर्ण कागदपत्रे सादर करण्यासाठी अन्य कोणत्याही संधीचा अथवा वाढीव मुदतीचा विचार करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

10/1/24.

**मा.महासंचालक यांच्या मान्यतेने**

(डॉ. सत्येंद्रनाथ चव्हाण)
**विभाग प्रमुख**
**डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था (बार्टी), पुणे**